# शहरातील वाहतूक कोंडीवर उपाय

'वेल बीगन इज हाफ डन' अशी एक इंग्रजी म्हण आहे. कोणत्याही गोष्टीची सुरूवात चांगली झाली तर ते काम फत्ते होते असा सकारात्मक अंदाज आपण घेवू शकतो. आपल्या कोल्हापूर शहरालाही ही गोष्ट लागू आहे.

कोल्हापूरचे धार्मिक, औद्योगिक, व्यापारी, पर्यटन, कृषी, आरोग्य क्षेत्रातील महत्व वाढत आहे व या कारणांनी देश विदेशातील अनेक लोक नेहमीच कोल्हापूर मध्ये येतात. अनेक शहरातून येणाऱ्या पॅसेंजर, व्यापारी व मालवाहतुक गाड्या या कोल्हापूरचे प्रवेशद्वार असणाऱ्या तावडे हॉटेल मार्गेशहरात प्रवेश करतात.

यापैकी अनेक वाहने कोल्हापूर मध्ये येणार असतात. पण कोकणकडे होणारी वाहतूक हि या मार्गेच शहरात येते. व या अवजड वाहतुकीमुळे या मार्गावरील ट्रॅफिकची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते. या वाहनांना तावडे हॉटेल, कावळा नाका, व्हीनस कॉर्नर, शिवाजी पुल मार्गे कोकणाकडे जावे लागते.

या वाहनांना आपण पर्यायी मार्ग दिल्यास अर्थातच शहरांतर्गत होणारी ही वाहतूक कमी होऊन येथील ट्रॅफिकची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होईल. या दृष्टीने आपण अभ्यास केल्यास याकरीता चार पर्यायी मॉडेल डि.पी. रोड आपण करू शकतो. हे चारही मॉडेल डी.पी. रोड हे शहराच्या डेव्हलपमेंट प्लॅनवर आहेत व बहुतांश ठिकाणी सध्या अस्तिवात असून वापरातही आहेत. परंतु काही थोड्या अंतराच्या रखडलेल्या कामामुळे हे अजूनही पूर्ण झालेले नाहीत. काही ठिकाणी तर अवघ्या २०० ते ३०० मीटर रस्ता नसल्यामुळे हा डि.पी. वापरात येत नाही आहे. याची पूर्तता केल्यास नक्कीच हे आपणास उपयुक्त ठरतील त्याची माहिती पुढीलप्रमाणे :-

पर्याय : रिव्हरसाईड होंडा येथून शुगर मील चौक डी.पी. मॉडेल रोड नं. १ व शुगर मील चौक ते खानविलकर पेट्रोल पंप हा डी.पी. रोड नं. ४ असा नकाशावर असलेला रस्ता विकसीत करणे.

**मॉडेल डी.पी. रोड नं. १ :** हा महानगरपालिकेच्या डी.पी. शीटवर ६० फुटी डी.पी. आहे. ह्याची सुरूवात रिव्हरसाईड होंडा या ठिकाणावरून होत असून अनंतपूरम बापट कॅम्प कदमवाडी ॲपल हॉस्पीटल, झूम प्रकल्प व शुगर मील चौक असा आहे. ह्या रस्त्याची एकूण लांबी ४.२ कि.मी. इतकी असून संपूर्ण ४.२ कि.मी. चा रस्ता विकसीत करणे गरजेचे आहे. ह्या रस्त्यामुळे पुण्याहून बावडामार्गेयेणारी सर्व वाहतूक कसबा बावडा गावातून न जाता बाहेरच्या बाहेर वळवता येईल. तसेच तावडे नाका मार्गेयेणारी सर्व वाहतूक कावळ्यानाक्याकडे न जाता बाहेरून चौकात आणता येईल.



**श्री.अभिजीत मगदूम**
भीमा बिल्डर्स

**मॉडेल डी.पी. रोड नं. २ :** म्हणजेच मुक्तसैनिक वसाहत येथून मॉडेल डी.पी. रोड नं.१ ला जोडणारा रस्ता हा एकूण १.५ कि.मी. लांबीचा आहे. पैकी जागेवर १.२ कि.मी. इतका डांबरी रस्ता अस्तित्वात असून फक्त ३०० मीटर रस्ता करणे गरजेचे आहे.

**मॉडेल डी.पी. रोड नं.३ :** म्हणजेच लिशा हॉटेल ते ॲपल हॉस्पीटल येथे मॉडेल डी.पी. रोड नं.१ ला जोडणारा रस्ता हा रस्ता एकूण २.३ कि.मी.लांबीचा आहे पैकी जागेवर २.१ कि.मी. इतका डांबरी रस्ता अस्तित्वात असून फक्त २०० मीटर रस्ता करणे गरजेचे आहे.

**मॉडेल डी.पी. रोड नं.४ :** म्हणजेच बावड्यातील श्रीराम सोसायटीच्या पेट्रोल पंपातून सुरू होऊन खानविलकर पंप येथे बाहेर पडणारा १०० फुटी रोड. ह्या रस्त्यामुळे पुण्याहून येणारे अथवा मॉडेल डी.पी. रोड नं.१ येथून येणारी सर्व वाहतूक कसबा बावडा गावातून न जाता डायरेक्ट खानविलकर पंप येथे बाहेर पडून या मार्गेकोल्हापूर शहरात जाऊ शकते. हा रस्ता एकूण ४.७ कि.मी. लांबीचा आहे पैकी जागेवर २०० मीटर इतका डांबरी रस्ता अस्तित्वात असून उर्वरित ४.५ कि.मी.चा रस्ता विकसीत करणे गरजेचे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| Model Road No.1: | Total | : | 4.5 km |
| | Developed | : | 250 mtr |
| | Proposed | : | 4.3 km |
| Model Road No.2: | Total | : | 1.15 km |
| | Developed | : | 850 mtr |
| | Proposed | : | 300 mtr |
| Model Road No.3: | Total | : | 1.66 km |
| | Developed | : | 1.46 Km |
| | Proposed | : | 200 mtr. |